**International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)**
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 8 Issue 12, December- 2018
ISSN(o): 2249-7382 | Impact Factor: 6.939 |

# दिवाकर कृष्णांचा कथेतील 'स्त्रीचित्रण

**- डॉ. अनिता वाळके**

**कर्मवीर महाविद्यालय, मूल**

मराठी लघुकथेचे एक शिल्पकार म्हणून ज्यांना ओळखले जाते ते दिवाकर कृष्ण केळकर.त्यांच्या कथा लेखनाने मराठी गोष्टीचे मराठी लघुकथेत रुपांतर झाले. गुलबर्ग जिल्ह्यातील गुंटकल येथे जन्मलेले दिवाकर मुंबई, पूणे, सांगली येथे राहुन एम.ए. एल.एल.बी झाल्यावर हैदराबाद येथे वकिलीचा व्यवसाय करु लागले.लहाणपणी दिवाकर कृष्ण् खूप बोलके होते व वाचनाचा त्यांना छंद ही होता. वाचनासोबतच त्यांना लिहायची देखील खूप हौस होती.त्यांनी वयाच्या आठव्या वर्षीच संभाषने लिहिली होती.12 व्या वर्षी एक छोटे नाटकही लिहिले होते. 1922 मध्ये मनोरंजन मासिकांच्या एका अंकातून अंगणातला पोपट ही त्यांची पहिली कथा प्रसिध्दी झाली जी वाचक वर्गाला खूप आवडली त्यानंतर त्यांनी लिहिलेल्या कथांचा संग्रह 1) समाधीव इतर सहा गोष्टी या नावाने प्रसिध्द झाला. नंतर 2) रुपगर्विता व इतर सहा गोष्टी हा कथासंग्रह झाला नंतर 3) महाराणी व इतर सहा कथा हा कथासंग्रह प्रसिध्द झाला "भावनांचे हकूवार चित्रण, अनुभव निष्ठेतून जन्माला आलेली काव्यात्मकता,सुयोग्य वातावरण निर्मिती आणि आशय पेलून धरणारी नेमकी भाषा ही दिवाकर कृष्णांच्या कथेची वैशिष्ट्ये होत" 1.

, दिवाकर कृष्णांनी तीन कथा संग्रहातून एकुण21 कथा लिहिल्या, ज्यातून स्त्री जीवनाची व्यथा त्यांनी मांडली आहे.दिवाकर कृष्णांचे स्त्री चित्रण वास्तव तसेच हद्यद्रावक आहे. स्त्रीयांच्या व्यथा वेदना सांगण्यासाठीच त्यांची कथा निर्मिती झाली असे त्यांच्या कथा अभ्यासतांना वाटून जाते, आजपर्यंत ज्या कथालेखकांनी स्त्री चित्रण केले त्यांत स्त्रीयांचे मन, तिच्या भावना मांडणारे कथाकार आपल्याला फार कमी दिसतील, आणि असतीलही तरी त्यात अंतर्मुख निष्ठतेचा अभाव दिसेल पण दिवाकर कृष्णांच्या कथेतील स्त्री ही कृत्रिम किंवा अवास्तव वाटत नाही. ती सच्ची, प्रामाणिक वाटते, कारण स्त्रीयांच्या वाट्याला आलेले दु:ख वेदना, तिच्या भावना तिचे अंतरमन अशा वेगवेगळ्या भावनांची उकल अतिशय नाजूक व हकूवार पध्दतीने दिवाकर कृष्णांची करुन कथेला एक वेगळे वळण दिले आहे. त्यांच्या कथा आकाराने लहान असल्या तरी आशयाने महान आहेत.

**International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)**
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 8 Issue 12, December- 2018
ISSN(o): 2249-7382 | Impact Factor: 6.939 |
RESEARCHERID
THOMSON REUTERS

त्यांच्या ‘हातरहाट’ कथेमधील मंजुळा हे स्त्रीपात्र जिवापलीकडे आपल्या प्रियकराला जपणारी, स्वभावाने प्रेमळ, गरीब पण तिचा प्रियकर भिवा पैशाचा लोभापाई शहरात नोकरीसाठी जातो. आणि खूप श्रीमंत होणाच्या नादात निर्मळ प्रेम गमावतो. मंजूळा दूसऱ्याशी लग्न करुनही सुखी होत नाही, कारण ती आपल्या प्रेमाला विसरु शकत नाही. म्हणूनच ती त्याचा आठवणीतहात्तरहाटावर सूत काढत असते. ‘संकष्टचतूर्थी’ मधील शांता, नवऱ्याचा सहवास लाभावा म्हणून धडपडणारी पण कोणताही गुन्हा नसतांना सासुच्या छळाला सहन करत करत मृत्यूच्या दारात पोहचते. बायकोच्या मृत्यूनंतर नवरा दूसरे लग्न करतो पण नवऱ्याच्या प्रेमासाठी झुरत मरणाऱ्या त्या पत्नीचे समाजातील वास्तवचित्र दिवाकर कृष्णांनी शांताच्या रुपाने रंगविले आहे. “एखादा फाटलेल्या पतंगासारखे फरफटणारे, आयुष्याच्या काठेरी जाळीत रक्तबंबाळ झालेले जीवन त्यांना लाभले असावे. त्यामुळे त्यांच्या कथावर एकप्रकाची विषादा आहे.” 2.

‘देवाच्या घरी’ या कथेतील सहा वर्षाची बालिका शशी पण तिच्या मनात असंख्य प्रश्न आहेत, झाडावर फुल कुठून येते, त्याला रंग कुणी दिला, रात्रीच्या तारका दिवसा कुठे जातात, या सर्व प्रश्नांची उत्तरे देवाने असे सांगुन समाप्त करावे लागते, पण शेवटी तिलाच देवाच्या घरी जावे लागते. असा नियतीचा खेळ दिवाकर कृष्ण रंगवितात. ‘मृणालीणीचे लावण्य या कथेत आपल्या सौंदर्यामुळेव चुकीच्या विचारांमूळे अशोकच्या जिवनाचे मातेरे झाले म्हणून दु:खी असलेल्यामृणालिणीच्या निर्मळ प्रेमाचा करुणभाव दिवाकरांनी या कथेत मांडला. “पौगंडावस्थेतून वाढीस लागलेल्या मुक्त प्रेमाची ही करुणरम्य भाव कथा म्हणून दिवाकरांच्या या कथेचा उल्लेख करता येईल.” 3.

‘जगायच मला’ या कथेतील मुन्नी लाचार अगतिक, एकटेपणाच्या आगीत होरपळून गेलेली, पण स्वत:च्या जिवनाचा विचार न करता एखाद्याला आधार देऊन जगायला शिकवले. स्त्री ही जागाची उध्दारी ही म्हण वास्तवात असणारे मून्नीचे स्त्री चित्रण दिवाकर कृष्णांनी रंगविले, जे वाचकाला घायाळ करते.

‘रुपगर्विता’ मधील पद्मा स्वत:च्या रुपामुळे व गर्विष्ठपणामुळे स्वत:चे व संसाराचे वाटोळे करते. तिच्या उर्मट स्वभावामुळे पती पत्नीत एकनिष्ठ प्रेम साध्य होऊ शकत नाही.शेवटी पश्चातापाशिवाय जिवनात काही शिल्लक राहत नाही. ‘दंडकारण्यातील प्रणयिणी’

कथेतील ऋता हि निलम व देव्रतच्या प्रेमासाठी स्वत:च्या प्रेमाचा त्याग करुन त्या दोघांना सुखी करुन जाते. स्त्री ही त्यागाची मुर्ती आहे.ही समर्पणाची भावना या कथेतून दिसून येते. पैसा प्रतिष्ठा यांच्या जोरावर काही मानसे स्त्रीला जिवनातून उठवितात. काही स्त्रीयांचे दु:खे सामाजिक परिस्थितीमूळे येतात असेच 'लोकनिंदेचा व्रतभंग' मधील सुधा सबनीस हिचे दु:ख अनेक स्त्रीयांच्या दु:खाचे प्रतिनिधीक बनून येते. सासरच्या मालकपणाची जाणीव व वडिलाच्या कुलीनत्वाचा अभिमान त्यामुळे सासर माहेर असुनही 'अनुराधेचे स्वप्न' या कथेत लोकनिंदित जीवन अनुराधा जगते.

'मलयागिरीवरील सायंकाळ' या कथेतील नायिका कलंकागी खेड्यात आलेल्या दक्षिणी पाहुण्याच्या सहवासात राहुन स्वत:च दु:ख ओढुन घेणारी आहे.

'दीपगृहावरील मध्यरात्र' यामधील कोळ्याच्या रंगेल व रगेल जीवनाच्या पार्श्वभूमीवर दर्यात डुबत असलेल्या प्रेयसीला विलक्षण साहाय्याने वाचविणारी कोळ्याची हकीकत दिवाकर कृष्ण कथेत मांडतात. महाराणी या कथेचा विचार करता तिचे लावण्य साऱ्या कथेला जबाबदार. सौंदर्य लाभणे ही निसर्गाची देणगी आहे, पण ते नसते तर सारे जग किती सुखी असते अशी म्हणणारी महाराणी हृदयाच्या शोधात साम्राज्य त्यागते. 'विनयभंग' कथेत दिवाकर कृष्ण लिहितात."किती तरी वेळ ते विचार करीत होते.प्रसंग आठवित होते.गणित करीत होते मनाचे मोजमाप आणि नियम व अंदाज आखडे कशालाच काही ताळमेळ नाही.तिच तिच कुटे त्यांनी पुन: पुन: सोडवून पाहिले पणउत्तरेचुकच येऊ लागली" 4.

असे मनोव्यापारातून कॉलेज जीवनातील तरुणीचे चित्र दिवाकर कृष्ण खुसखुशीत पध्दतीने रंगवितात. 'मांजरीचे पिल्ले' या कथेत एक मांजरी, तिची पिल्ले त्यावर आकृष्ट झालेली मिनी यांच्या सहजीवनातील स्थितंतरे हळूवारपणे दिवाकर कृष्ण रेखाटतात. 'कैलासाचा निर्माता' या कथेतून मानकावतीच्या क्रुर स्वभावावर हळूवार प्रकाश टाकला आहे.

'समाधी' मधिल नायिका लीलागौरी .गरीब कुटंबातून एकदम राजघराण्यात पडलेली.आता ती राज्याची राणी आहे, दागदागीणे व कपड्यांनी मढलेली तिला भरपूर सुख असायला हवे होते, पण तिच्या मनाचा कोंडमारा वेगळाच होता. श्रीमंतीमुळेमाहेरच्या माणसात व आपल्या नात्यात दरी निर्माण झाली हे तिला सहन होत नाही.तिला राणी आहोत ही जाणीव कोणी विसरु देत नाही, त्यामुळे खरे सुख तिला मिळतच नाही. मात्र पदमावतीच्या समाधीची ओढ तिच्या

कोंडमाऱ्यांचे लहानसे प्रतीक आहे. "कळी का उमलत नाही हे कळी काय सांगणार? ते भोवतालच्या थंडीला विचार" 5.

'वेड्याच्या कहाणी' मधील 'तारिणी' नियतीमुळे तिचे सारे स्वप्न संपते.एका श्रीमंत कंत्राटदाराच्या गोऱ्या गोमट्या मुलाशी तिच्या विवाह होतो, पण ती आपल्या प्रेमाला विसरु शकत नाही. व्यवहारी जगात तिचा भावनांची किंमत नसते. आपल्या प्रियकरावर आलेल्या आपत्तीने तिचा जिव गुदमरुन जातो पण तिचे दु:ख कोणालाही कळू शकत नाही.

अशा विविध कथेतून दिवाकर कृष्णांची स्त्री जीवनातील दु:ख, व्यथा मांडली. पण ही दु:खे सामाजिक नाही तर वैयक्तिक आहेत. त्यांच्या नायिकेच्या भावविवश स्वभावातून ही दु:खे निर्माण झाली आहेत. प्रत्येकीच्या स्वभावाची एक वेगळी घडण असते. प्रत्येक वेळेसच स्त्रीला भोवतालच्या व्यवहारी जगाशी तडजोड करता येईलच असे नाही. त्यावेळेस तिचे मन कोमेजून जाते. दिवाकर कृष्णांच्या कथेतील नायीका अशा मनातल्या मनात झुरतांना दिसतात. त्यांच्या कथेतील स्त्री दु:खाच्या गडद छायेत दिसते. तिचे जिवन निराशेने भरलेले दिसते.अशा प्रकारे दिवाकर कृष्णांनी वेगवेगळ्या स्वभावांच्या स्त्रीयांच्या वेगवेगळ्या भावना विविध प्रतिमामधून साकार केल्या आहे. दिवाकर कृष्णांनी कल्पनारम्य कथा लिहिण्याचे कंकन बांधले नव्हतेच, तर कल्पनारम्य कथातूनही ज्या व्यक्ती वावरतात त्यांची दु:खे, त्यांचे मन रंगविण्याचा दिवाकर कृष्णांचा प्रयत्न फार निराळा होता म्हणूनच, त्यांचे स्त्रीजीवन वास्तव दर्शनघडविणारे राहत नाही.

## संदर्भ

1) दा. वि. कुलकर्णी - मराठी कथा स्वरुप आणि आस्वाद स्वाध्याय प्रकाशन 577, सदाशिव पेठ प्रथमावृत्ती जुन 1976, पृष्ठ -201
2) भालचंद्र दिनकर फडके - मराठी कथेची वाटचाल, 1800 ते 1950 पुणे विद्यापीठ, पृष्ठ 312, टंकलिखित प्रबंध पुणे विद्यापीठ)
3) दा. वि. कुलकर्णी - उनि पृष्ठ 205
4) भालचंद्र दिनकर फडके - उनि पृष्ठ 323
5) म. ना. अदवंत - मराठी कथाकार, (कथाकार कृष्ण दिवाकर) अमोल प्रकाशन, पृष्ठ 60